| | | सुनावणीचा दि. 02.06.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 1 | 689/2024 | श्री. संभाजी दुर्गादास गुढे, रा. गुढे नगर, अंबड ता. अंबड जि. जालना | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय अंबड जि. जालना | मुख्याधिकारी, नगर परिषद अंबड जि. जालना | |
| 2 | 690/2024 | श्री. संभाजी दुर्गादास गुढे, रा. गुढे नगर, अंबड ता. अंबड जि. जालना | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय अंबड जि. जालना | मुख्याधिकारी, नगर परिषद अंबड जि. जालना | |
| 3 | 691/2024 | श्री. संभाजी दुर्गादास गुढे, रा. गुढे नगर, अंबड ता. अंबड जि. जालना | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय अंबड जि. जालना | मुख्याधिकारी, नगर परिषद अंबड जि. जालना | |
| 4 | 692/2024 | श्री. संभाजी दुर्गादास गुढे, रा. गुढे नगर, अंबड ता. अंबड जि. जालना | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय अंबड जि. जालना | मुख्याधिकारी, नगर परिषद अंबड जि. जालना | |
| 5 | 693/2024 | श्री. संभाजी दुर्गादास गुढे, रा. गुढे नगर, अंबड ता. अंबड जि. जालना | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय अंबड जि. जालना | मुख्याधिकारी, नगर परिषद अंबड जि. जालना | |
| 6 | 694/2024 | श्री. संभाजी दुर्गादास गुढे, रा. गुढे नगर, अंबड ता. अंबड जि. जालना | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय अंबड जि. जालना | मुख्याधिकारी, नगर परिषद अंबड जि. जालना | |
| 7 | 695/2024 | श्री. संभाजी दुर्गादास गुढे, रा. गुढे नगर, अंबड ता. अंबड जि. जालना | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय अंबड जि. जालना | मुख्याधिकारी, नगर परिषद अंबड जि. जालना | |
| 8 | 696/2024 | श्री. संभाजी दुर्गादास गुढे, रा. गुढे नगर, अंबड ता. अंबड जि. जालना | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय अंबड जि. जालना | मुख्याधिकारी, नगर परिषद अंबड जि. जालना | |
| 9 | 697/2024 | श्री. संभाजी दुर्गादास गुढे, रा. गुढे नगर, अंबड ता. अंबड जि. जालना | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय अंबड जि. जालना | मुख्याधिकारी, नगर परिषद अंबड जि. जालना | |
| 10 | 698/2024 | श्री. संभाजी दुर्गादास गुढे, रा. गुढे नगर, अंबड ता. अंबड जि. जालना | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय अंबड जि. जालना | मुख्याधिकारी, नगर परिषद अंबड जि. जालना | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 02.06.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 11 | 699/2024 | श्री. संभाजी दुर्गादास गुढे, रा. गुढे नगर, अंबड ता. अंबड जि. जालना | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय अंबड जि. जालना | मुख्याधिकारी, नगर परिषद अंबड जि. जालना | |
| 12 | 700/2024 | श्री. संभाजी दुर्गादास गुढे, रा. गुढे नगर, अंबड ता. अंबड जि. जालना | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय अंबड जि. जालना | मुख्याधिकारी, नगर परिषद अंबड जि. जालना | |
| 13 | 1395/2024 | श्री. खतीब रियाजोदिन कुतुबोदिन रा. खतीब मोहल्ला परतुर ता. परतुर जि. जालना | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय परतुर जि. जालना | मुख्याधिकारी, नगर परिषद परतुर जि.जालना | |
| 14 | 1319/2024 | श्री. रावसाहेब खिराजी भापकर, रा. आनंदवाडी ता. परतंर जि. जालना | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय परतुर जि. जालना | मुख्याधिकारी, नगर परिषद परतुर जि.जालना | |
| 15 | 6905/2024 | श्री. मदन बाळकृष्ण आवटी,रा. टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि.जालना | लेखाधिकारी, नगर पंचायत जाफ्राबाद जि. जालना | मुख्याधिकारी, नगर पंचायत जाफ्राबाद जि. जालना | |
| 16 | 10490/2024 | श्री.पठाण सलमानखा अंगिसखा, रा. भोकरदन रोड नवीन जाफ्राबाद ता. जाफ्राबाद जि.जालना | ज.मा.अ. नगर पंचायत कार्यालय जाफ्राबाद जि.जालना | मुख्याधिकारी, नगर पंचायत जाफ्राबाद जि. जालना | |
| 17 | 10604/2024 | श्री शेख मोहसीन शेख यासिन, रा. अंदरुन किल्ल जाफ्राबाद ता. जाफ्राबाद जि.जालना | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय जाफ्राबाद जि.जालना | मुख्याधिकारी, नगर परिषद जाफ्राबाद जि. जालना | |
| 18 | 10727/2024 | श्री. राजेंद्र माणिकराव जाधव, रा. रत्नमाला लॉन्स जाफ्राबाद रोड भोकरदन ता. भोकरदन जि.जालना | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय भोकरदन जि.जालना | मुख्याधिकारी, नगर परिषद भोकरदन जि. जालना | |
| 19 | 10728/2024 | श्री. राजेंद्र माणिकराव जाधव, रा. रत्नमाला लॉन्स जाफ्राबाद रोड भोकरदन ता. भोकरदन जि.जालना | नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय भोकरदन जि.जालना | उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय भोकरदन जि.जालना | |
| 20 | 273/2021 | श्री. वामन एकनाथ उगले, रा. प्रगती चाळ, नंबर 02, रुम नंबर 4 घर नबंर 8686, सावंत पार्कच्या पाठीमागे, खदानजवळ, महालक्ष्मीनगर, अंबरनाथ (पुर्व), जि. ठाणे-421501 | लेखा विभाग, नगर पंचायत मंठा जि. जालना | मुख्याधिकारी, नगर पंचायत मंठा जि. जालना | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 02.06.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 21 | 7803/ 2024 | श्री. संतोष रामनिवास तिवारी, रा. मारवाडी गल्ली, मंठा ता. मंठा जि.जालना | कार्यालय, अधिक्षक, नगर पंचायत मंठा जि. जालना | मुख्याधिकारी, नगर पंचायत मंठा जि.जालना | |
| 22 | 7804/ 2024 | श्री. शेषराव शिवाजीराव बोराडे, रा. बोराडे गल्ली मंठा ता. मंठा जि.जालना | कार्यालय, अधिक्षक, नगर पंचायत मंठा जि. जालना | मुख्याधिकारी, नगर पंचायत मंठा जि.जालना | |
| 23 | 1294/ 2024 | श्री. शिवाजी भानुदास म्हस्के, रा. इंदिरानगर अंबड ता. अंबड जि. जालना | ज.मा.अ. नगर पंचायत कार्यालय बदनापुर जि. जलाना | मुख्याधिकारी, नगर पंचायत बदनापुर जि.जालना | |
| 24 | 2158/ 2024 | श्री. सय्यद रफिक सय्यद लाल, रा. हिमायतनगर प्लॉट नबंर 14, आरेफ कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. नगर पंचायत कार्यालय बदनापुर जि. जालना | मुख्याधिकारी, नगर पंचायत बदनापुर जि. जालना | |
| 25 | 2159/ 2024 | श्री. सय्यद रफिक सय्यद लाल, रा. हिमायतनगर प्लॉट नबंर 14, आरेफ कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. नगर पंचायत कार्यालय बदनापुर जि. जालना | मुख्याधिकारी, नगर पंचायत बदनापुर जि. जालना | |
| 26 | 2160/ 2024 | श्री. सय्यद रफिक सय्यद लाल, रा. हिमायतनगर प्लॉट नबंर 14, आरेफ कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. नगर पंचायत कार्यालय बदनापुर जि. जालना | मुख्याधिकारी, नगर पंचायत बदनापुर जि. जालना | |
| 27 | 8492/ 2024 | श्री. शिवाजी भानुदास मस्के, रा. इंदिरा नगर अंबड ता. अंबड जि. जालना | ज.मा.अ. नगर पंचायत कार्यालय, घनसावंगी जि.जालना | मुख्याधिकारी, नगर पंचायत घनसावंगी जि.जालना | |
| 28 | 5703/ 2024 | श्री. सुयोग अंबादासराव खेडेकर, रा. JES कॉलेज रोड, जालना | उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियत्रंण मंडळ, प्लॉट नबंर पी-3/1,3/02, अतिरिक्त एम.आय.डी.सी जालना औरंगाबाद रोड जालना | जिल्हा प्रदुषण अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियत्रंण मंडळ, प्लॉट नबंर पी-3/1,3/02, अतिरिक्त एम.आय.डी.सी जालना औरंगाबाद रोड जालना | |
| 29 | 1992/ 2024 | श्री. संजय त्रिबंक उनगे, रा. मुकुंद निवास माळी गल्ली बदनापुर ता. बदनापुर जि. जालना | ज.मा.अ. राज्य उत्पादन शुल्क कार्यालय जालना | अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क कार्यालय जालना | |
| 30 | 7585/ 2024 | श्री. मिलिंद दिनकर वाहुळे, रा. श्रीपतधामनगांव पो. कुंज (बु), ता. घनसावंगी जि. जालना | कार्यालय अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, जालना | अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, जालना | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 02.06.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 31 | 793/2024 | श्री. संजय त्रिबंक उनगे, रा. मुकुंद निवास, माळी गल्ली, बदनापुर ता. बदनापुर जि. जालना | उप अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अति जालना औद्यगीक वसाहत, क्षेत्र अप्पा क्र. 01 पाण्याच्या टाकीजवह, जालना | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, रेल्वेस्टेशन जवळ, छत्रपती संभाजीनगर | |
| 32 | 4494/2024 | श्री. संजय त्रिबंक उनगे, रा. मुकुंद निवास माळी गल्ली बदनापुर ता. बदनापुर जि. जालना | उप अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ उपविभाग जालना | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकस महामंडळ, उद्योग शक्ती इमारत तिसरा मजला, रेल्वेस्टेशन रोड छत्रपती संभाजीनगर | |
| 33 | 1113/2024 | श्री. वामन एकनाथ उगले, रा. प्रगती चाळ नबंर 02 रुम नबंर 4, घर नबंर 8686, सावंत पार्कच्या पाठीमागे खदानजवळ महालक्ष्मीनगर, अबंरनाथ (पुर्व), जि. ठाणे-421501 | कार्यालय अधिक्षक, जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय जालना | जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय जालना | |
| 34 | 1114/2024 | श्री. वामन एकनाथ उगले, रा. प्रगती चाळ नबंर 02 रुम नबंर 4, घर नबंर 8686, सावंत पार्कच्या पाठीमागे खदानजवळ महालक्ष्मीनगर, अबंरनाथ (पुर्व), जि. ठाणे-421501 | मुख्यालय सहाय्यक उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय जालना | उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय जालना | |
| 35 | 1138/2024 | श्री. अभिषक बालाप्रसाद व्यास, रा. बीडसडक राम मंदिर जवळ, जालना | मुख्यालय सहाय्यक उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय जालना | उप अधिक्षक भुमि अभिलख कार्यालय जालना | |
| 36 | 4173/2024 | श्री. देवचंद पुनमचंद सावरे, रा. मस्तगड जालना | मुख्यालय सहाय्यक, उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय जालना | उप अधिक्षक भुमि अभिलख कार्यालय जालना | |
| 37 | 8491/2024 | श्री. अभिमन्यु मनोहराव लोखंडे, रा. मोरंडी मोहल्ला, जुना जालना | मुख्यालय सहाय्यक उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय प्रशासकीय इमारात दुसरा मजला, जालना | उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय प्रशासकीय इमारात दुसरा मजला, जालना | |
| 38 | 8677/2024 | श्री. लक्ष्मण सोनाजी जाधव, रा. राजहर्षी शाहु नगर, ज्ञान ज्योत शाळेच्या बाजुला अंबड रोड, जालना | मुख्यालय सहाय्यक उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय प्रशासकीय इमारात दुसरा मजला, जालना | उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय प्रशासकीय इमारात दुसरा मजला, जालना | |
| 39 | 641/2024 | श्री. शिवनारायण फकिरबा खबाट, रा. पिंपळखुटा ता. जाफ्राबाद जि. जालना | ज.मा.अ. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था जाफ्राबाद जि. जालना | ज.अ.अ. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था जाफ्राबाद जि. जालना | |
| 40 | 10901/2024 | श्री. शिवनारायण फकिरबा खबाट, रा. पिंपळखुटा ता. जाफ्राबाद जि. जालना | उप जिल्हा निबंधक, सहाकरी संस्था, जालना | जिल्हा निबंधक सहाकरी संस्था, जालना | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 02.06.2025 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 41 | 1318/ 2024 | श्री. अभिमन्यु मनोहरराव लोखंडे, रा. मोरंडी मोहल्ला जुना जालना | नगर रचना विभाग, जालना शहर महानगरपालिका, जालना | आयुक्त, जालना शहर महानगरपालिका, जालना | |
| 42 | 4552/ 2024 | श्री. अभिमन्यु मनोहरराव लोखंडे, रा. मोरंडी मोहल्ला जुना जालना | कार्यालय अधिक्षक, जालना शहर महानगरपालिका, जालना | आयुक्त, जालना शहर महानगरपालिका, जालना | |
| 43 | 8147/ 2024 | श्री. अभिमन्यु मनोहरराव लोखंडे, रा. मोरंडी मोहल्ला जुना जाना | रमाई घरकुल योजना कक्ष, जालना शहर महानगरपालिका, जालना | आयुक्त, जालना शहर महानगरपालिका, जालना | |
| 44 | 8148/ 2024 | श्री. अभिमन्यु मनोहरराव लोखंडे, रा. मोरंडी मोहल्ला जुना जाना | सहाय्यक संचालक नगर रचना विभाग, जालना शहर महानगरपालिका, जालना | आयुक्त, जालना शहर महानगरपालिका, जालना | |
| 45 | 8149/ 2024 | श्री. अभिमन्यु मनोहरराव लोखंडे, रा. मोरंडी मोहल्ला जुना जाना | रमाई घरकुल योजना कक्ष, जालना शहर महानगरपालिका, जालना | आयुक्त, जालना शहर महानगरपालिका, जालना | |
| 46 | 8150/ 2024 | श्री. अभिमन्यु मनोहरराव लोखंडे, रा. मोरंडी मोहल्ला जुना जाना | रमाई घरकुल योजना कक्ष, जालना शहर महानगरपालिका, जालना | आयुक्त, जालना शहर महानगरपालिका, जालना | |
| 47 | 9116/ 2024 | श्री. अभिमन्यु मनोहरराव लोखंडे, रा. मोरंडी मोहल्ला जुना जालना | रमाई घरकुल विभाग प्रमुख, जालना शहर महानगरपालिका, जालना | आयुक्त, जालना शहर महानगरपालिका, जालना | |
| 48 | 1139/ 2024 | श्री. अभिषेक बालाप्रसाद व्यास, रा. बीडसडक राम मंदिर जवळ, जालना | कार्यालय अधिक्षक, जालना शहर महानगरपालिका, जालना | आयुक्त, जालना शहर महानगरपालिका, जालना | |
| 49 | 1843/ 2024 | श्री. उध्दव शंकर पाईकराव, रा. खांडसरी विभाग देऊळगांव राजा रोड, जालना | सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना शहर महानगरपालिका, जालना | आयुक्त, जालना शहर महानगरपालिका, जालना | |
| 50 | 4165/ 2024 | श्री. देवचंद पुनमचंद सावरे, रा. मस्तगड जालना | शहर अभियंता, जालना शहर महानगरपालिका, जालना | आयुक्त, जालना शहर महानगरपालिका, जालना | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 02.06.2025 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 51 | 4166/ 2024 | श्री. देवचंद पुनमचंद सावरे, रा. मस्तगड जालना | स्वच्छता विभाग प्रमुख, जालना शहर महानगरपालिका, जालना | आयुक्त, जालना शहर महानगरपालिका, जालना | |
| 52 | 4174/ 2024 | श्री. देवचंद पुनमचंद सावरे, रा. मस्तगड जालना | शहर अभियंता, जालना शहर महानगरपालिका, जालना | आयुक्त, जालना शहर महानगरपालिका, जालना | |
| 53 | 9004/ 2024 | श्री. संतोष दिनकरराव अग्णीहोत्री, रा. कसबा विठ्ठल मंदिरा जवळ जुना जालना | कार्यालय अधिक्षक, जालना शहर महानगरपालिका, जालना | आयुक्त, जालना शहर महानगरपालिका, जालना | |
| 54 | 8975/ 2024 | श्री. विकास कुमार बागडी, रा. नाथगल्ली सदर बाजार, जालना | आस्थापना विभाग, जालना महानगरपालिका, जालना | आयुक्त, जालना शहर महानगरपालिका, जालना | |
| 55 | 8976/ 2024 | श्री. विकास कुमार बागडी, रा. नाथगल्ली सदर बाजार, जालना | मालमत्ता विभाग, जालना महानगरपालिका, जालना | आयुक्त, जालना शहर महानगरपालिका, जालना | |
| 56 | 8977/ 2024 | श्री. विकास कुमार बागडी, रा. नाथगल्ली सदर बाजार, जालना | मालमत्ता विभाग, जालना महानगरपालिका, जालना | आयुक्त, जालना शहर महानगरपालिका, जालना | |
| 57 | 8978/ 2024 | श्री. विकास कुमार बागडी, रा. नाथगल्ली सदर बाजार, जालना | मालमत्ता विभाग, जालना महानगरपालिका, जालना | आयुक्त, जालना शहर महानगरपालिका, जालना | |
| 58 | 8979/ 2024 | श्री. विकास कुमार बागडी, रा. नाथगल्ली सदर बाजार, जालना | मालमत्ता विभाग, जालना महानगरपालिका, जालना | आयुक्त, जालना शहर महानगरपालिका, जालना | |
| 59 | 8980/ 2024 | श्री. विकास कुमार बागडी, रा. नाथगल्ली सदर बाजार, जालना | नगर रचना विभाग, जालना महानगरपालिका, जालना | आयुक्त, जालना शहर महानगरपालिका, जालना | |
| 60 | 8981/ 2024 | श्री. विकास कुमार बागडी, रा. नाथगल्ली सदर बाजार, जालना | आस्थापना विभाग, जालना महानगरपालिका, जालना | आयुक्त, जालना शहर महानगरपालिका, जालना | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 02.06.2025 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 61 | 8982/2024 | श्री. विकास कुमार बागडी, रा. नाथगल्ली सदर बाजार, जालना | आस्थापना विभाग, जालना महानगरपालिका, जालना | आयुक्त, जालना शहर महानगरपालिका, जालना | |
| 62 | 8983/2024 | श्री. विकास कुमार बागडी, रा. नाथगल्ली सदर बाजार, जालना | आस्थापना विभाग, जालना महानगरपालिका, जालना | आयुक्त, जालना शहर महानगरपालिका, जालना | |
| 63 | 277/2024 | श्री. वैजिनाथ गुलाबराव दिघे, रा. चितोडा पो. पीर पिंपळगाव ता. बदनापुर जि. जालना | प्राचार्य, बद्रीनारायण बारवाले कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जालना | कक्ष अधिकारी, विशेष कक्ष, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर | |
| 64 | 7678/2024 | श्री. विकास कुमार बागडी, रा. नाथ गल्ली, सदर बाजार, जालना | नगर रचना विभाग, जालना महानगरपालिका, जालना | आयुक्त, जालना महानगरपालिका, जालना | |
| 65 | 7680/2024 | श्री. विकास कुमार बागडी, रा. नाथ गल्ली, सदर बाजार, जालना | नगर रचना विभाग, जालना महानगरपालिका, जालना | आयुक्त, जालना महानगरपालिका, जालना | |
| 66 | 7681/2024 | श्री. विकास कुमार बागडी, रा. नाथ गल्ली, सदर बाजार, जालना | नगर रचना विभाग, जालना महानगरपालिका, जालना | आयुक्त, जालना महानगरपालिका, जालना | |
| 67 | 7682/2024 | श्री. विकास कुमार बागडी, रा. नाथ गल्ली, सदर बाजार, जालना | नगर रचना विभाग, जालना महानगरपालिका, जालना | आयुक्त, जालना महानगरपालिका, जालना | |
| 68 | 006/2024 | श्री. बाजीराव भिकाजी हिवाळे, रा. शिवाजीनगर म्हाडा नवीन मोंढा रोड, जालना | अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महावितरण शहर उपविभाग मस्तगड पवार हाऊस जालना | कार्यकारी अभियंता, महावितरण शहर उपविभाग मस्तगड पवार हाऊस जालना | |
| 69 | 2340/2024 | श्री. शिवाजी भाऊराव बनकर, मु. बुटखेडा पो. अकोला देव ता. जाफ्राबाद जि. जालना | उप कार्यकारी अभियंता, महावितरण उपविभाग जाफ्राबाद जि. जालना | कार्यकारी अभियंता, महावितरण क्र.01, जुन पावर हाऊस परिसर मस्तगड दर्गा रोड, जालना | |
| 70 | 2341/2024 | श्री. शिवाजी भाऊराव बनकर, मु. बुटखेडा पो. अकोला देव ता. जाफ्राबाद जि. जालना | उप कार्यकारी अभियंता, महावितरण उपविभाग जाफ्राबाद जि. जालना | कार्यकारी अभियंता, महावितरण क्र.01, जुन पावर हाऊस परिसर मस्तगड दर्गा रोड, जालना | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 02.06.2025 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 71 | 2342/2024 | श्री. शिवाजी भाऊराव बनकर, मु. बुटखेडा पो. अकोला देव ता. जाफ्राबाद जि. जालना | उप कार्यकारी अभियंता, महावितरण उपविभाग जाफ्राबाद जि. जालना | कार्यकारी अभियंता, महावितरण क्र.01, जुन पावर हाऊस परिसर मस्तगड दर्गा रोड, जालना | |
| 72 | 2343/2024 | श्री. शिवाजी भाऊराव बनकर, मु. बुटखेडा पो. अकोला देव ता. जाफ्राबाद जि. जालना | उप कार्यकारी अभियंता, महावितरण उपविभाग जाफ्राबाद जि. जालना | कार्यकारी अभियंता, महावितरण क्र.01, जुन पावर हाऊस परिसर मस्तगड दर्गा रोड, जालना | |
| 73 | 7747/2024 | श्रीमती. सोनी गणेश अडीयाल, रा. सोनल नगर, निलम टाकीज च्या मागे, रेल्वेस्टेशन, जालना | ज.मा.अ. महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी कार्यालय मस्तगड, विभाग, क्र.01 जालना | मुख्याधिकारी, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी कार्यालय सर्कल कार्यालय विभाग, क्र.02 जालना | |
| 74 | 9687/2024 | डॉ. सुरेखा शिवाजी भालशंकर, रा. प्लॉट नंबर 67, समार्थ नगर, अंबड रोड, जिल्हा परिषद ऑफिसच्या पाठीमागे, सतकर कॉम्प्लेक्स, जालना-431213 | ज.मा.अ. मंडळ कार्यालय महावितरण कंपनी कन्हैयानगर, जालना | ज.मा.अ. मंडळ कार्यालय महावितरण कंपनी कन्हैयानगर, जालना | |
| 75 | 10218/2024 | श्री. सय्यद रफिक सय्यद लाल, रा. हिमायतनगर, प्लॉट नंबर 14, आरेफ कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | कार्यकारी अभियंता (प्रशासन), महावितरण कार्यालय मंडळ जुनी एम.एस.ई.बी. वसाहत कन्हैय्या नगर, देऊळगाव राजा रोड, जालना | अधिक्षक अभियंता, महावितरण कार्यालय मंडळ जुनी एम.एस.ई.बी. वसाहत कन्हैय्या नगर, देऊळगाव राजा रोड, जालना | |
| 76 | 723/2024 | श्री. तरंग लक्ष्मणराव कांबळे, रा. फुले नगर अंबड ता. अंबड जि. जालना | प्रशासकीय अधिकारी, उपजिल्हा रुग्णालय अंबड जि. जालना | वैद्यकीय अधिकारी, उपजिल्हा रुग्णालय अंबड जि. जालना | |
| 77 | 1764/2024 | श्री. तरंग लक्ष्मणराव कांबळे, रा. फुले नगर अंबड ता. अंबड जि. जालना | ज.मा.अ. उपजिल्हा रुग्णालय अंबड जि. जालना | वैद्यकीय अधिकारी, उपजिल्हा रुग्णालय अंबड जि. जालना | |
| 78 | 2337/2024 | श्री. एकनाथ रामधन राठोड, रा. बेगमपुरा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर | प्रशासकीय अधिकारी, सामान्य रुग्णालय जालना | जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय जालना | |
| 79 | 6849/2024 | श्री. समीउदिन कमरोदिन काझी, रा. महाविर नगर चिखली, ता.चिखली जि. बुलढाणा | ज.मा.अ. जिल्हा स्त्री व बाल रुग्णालय जालना | ज.अ.अ. जिल्हा स्त्री व बाल रुग्णालय जालना | |
| 80 | 8490/2024 | श्री. प्रशांत आसाराम बोनगे, रा. अंबा ता. परतुर जि. जालना | जिल्हा हिवताप अधिकारी, जिल्हा हिवताप कार्यालय, जालना | उपसंचालक, उपसंचालक आरोग्य सेवा, बाबा पेट्रोलपंपा समोर महाविर चौक, छत्रपती संभाजीनगर | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १३९५/२०२४**
**बोर्ड क्र.१३**

श्री. खतीब रियाजोद्दीन कुतुबोद्दिन, — अपिलार्थी
रा. खतीब मोहल्ला, परतूर, ता. परतूर, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, परतूर, जि. जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद कार्यालय, परतूर, जि. जालना

**(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०७.०२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी , जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १२.०९.२०२३ | १. परतूर सेलू रोडच्या लगत उत्तरेकडील प्लॉटचे झालेले नामात्तराची घर नंबरसह यादी<br>२.परतूर शहराचा गावठाण भाग (एरिया) कुठून कुठपर्यंत आहे सवीस्तर माहिती देण्याबाबत.<br>३. परतूर शहरात प्लॉटींग पाडून त्यामधून सोडलेले ओपन स्पेस कुठे कुठे आहे व आज रोजी नगर परिषदच्या किती व कुठेकुठे आहे सवीस्तर माहिती देणे.<br>४. घर नं.५१५२ ते ५१५९ चे नामांत्तर करताना बेटरमेंट चार्ज किती घेतले त्या पावतीची झेरॉक्स नक्कल देणे.<br>५. सन २०१८ ते आजपर्यंत गावठाण प्रमाणपत्र इशू केले व कोणकोणत्या भागाचे दिले याची यादी देणे. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद दिल्याचे दिसुन येत नाही. अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०९.११.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे दिसुन येत आहे. तथापि सदर आदेशाची अमंलबजावणी झाल्याचे दिसुन येत नाही. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती ही अनेक विषयाशी निगडीत आहे. मात्र महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (पहिली सुधारणा) २०१२ नुसार अपिलार्थी यांना एका माहिती अर्जामध्ये एका विषयावर (माहिती अर्जातील प्रथम विषयावर) माहिती अनुज्ञेय आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, परतूर, जि. जालना यांनी वर नमुद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहीत तरतुदीनुसार देय होणारी एका विषयावरील माहिती (माहिती अर्जातील प्रथम विषयाची), आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे कलम ७(६) नुसार विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करून देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) स्पष्टपणे कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, परतूर, जि. जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, परतूर, जि. जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रशाइं.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 6164 दिनांक : 16/06/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १३१९/२०२४
बोर्ड क्र.१४

श्री. रावसाहेब खिराजी भापकर, — अपिलार्थी
रा. आनंदवाडी, ता. परतूर, जि. जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, परतूर, जि. जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद कार्यालय, परतूर, जि. जालना

(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०७.०१.२०२३ | परतूर येथील सर्व्हे नं.१४५ मध्ये घर नं.२४९ संदर्भात बांधकाम करण्यासाठी घेतलेला परवाना याची प्रत मिळणेबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणी करीता अपिलीर्थी अनुपस्थित आहेत. मात्र, त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांना माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, परतूर, जि. जालना यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, परतूर, जि. जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, परतूर, जि. जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, परतूर, जि.जालना यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6165 दिनांक : 16/06/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६९०५/२०२४**
**बोर्ड क्र.१५**

श्री.मदन बाळकृष्ण आवटी,
मु.पो.टेभुंर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
लेखापाल, नगर पंचायत, जाफ्राबाद जि.जालना : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,
नगर पंचायत, जाफ्राबाद जि.जालना : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २६.०२.२०२४ | न.प.सार्वत्रा कि निवडणुक सन २०२१ साठी केलेली आर्थिक तरतुद व खर्चाची माहिती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी असे अवगत केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२८.०६.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे एकुण २७ पृष्ठांची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यामुळे विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(सही)
**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र.- 6766 दिनांक :- 16/06/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १०४९०/२०२४
बोर्ड क्र.१६

श्री.पठाण सलमानखाॅ अनिस खाॅ., अपिलार्थी
रा.भोकरदन रोड नवीन जाफ्राबाद,
ता.जाफ्राबाद जि.जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
लेखापाल, नगर पंचायत, जाफ्राबाद जि.जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, : उत्तरवादी क्र.२
नगर पंचायत, जाफ्राबाद जि.जालना

(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.०९.२०२४ | शासनामार्फत दि.०१.०१.२०२३ ते ०९.०९.२०२४ पर्यंतची प्राप्त निधीची माहिती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी असे अवगत केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०६.१२.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे माहितीचे अवलोकन करून आवश्यक असलेली माहिती प्राप्त करून घेणेबाबत कळविण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थी हे अवलोकनाकरीता कार्यालयात हजर राहीले नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना अवलोकनाची संधी उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. तथापि अपिलार्थी माहितीच्या अवलोकनाकरीता कार्यालयात उपस्थित राहीले नसल्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीकरीता

देखील अपिलार्थी आयोगापुढे अनुपस्थित आहेत. यावरून अपिलार्थी यांना हवी असलेली माहिती प्राप्त करण्यात स्वारस्य असल्याचे दिसुन येत नाही, असे आयोगाचे प्रथमदर्शनी ठाम मत झालेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 6232 दिनांक : 18/06/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -१०६०४/२०२४
बोर्ड क्र.१७

श्री. शेख मोहसीन शेख यासिन, — अपिलार्थी
रा. अंदरुन किल्ला, जाफ्राबाद, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, जाफ्राबाद, जि. जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद कार्यालय, जाफ्राबाद, जि. जालना

**(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०३.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १२.०९.२०२४ | मौ. जाफ्राबाद येथील खडकपुर्णा अंतर्गत बुडीत क्षेत्रात विकासात्मक कामे करता येते किंवा नाही. तसेच नगर पंचायत बांधकाम परवानगी देता येते किंवा नाही याबाबत लेखी माहिती मिळावी. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ब्लँक स्टोन कंपनीला सन २०१९ ते आजपर्यंत किती रक्कमेचे बिले अदा करण्यात आली व कोणत्या खात्यातून दिले याबाबत पुर्ण तपशीलवार लेखी माहिती देणेबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०२.१२.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०२.१२.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत

आहे. आज रोजी सुनावणी करीता अपिलार्थी गैरहजर आहेत. तथापी त्यांनी आयोगाकडील दाखल द्वितीय अपील प्रयोजनामध्ये माहिती मिळाली नाही, असे कारण नमुद केलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये प्रश्नार्थक स्वरूपाची माहिती मागितल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे अशी माहिती, अधिनियमातील कलम २(च) मधील माहितीच्या व्याख्येत बसत नसल्याने अपिलार्थी यांना देय होत नाही, निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6167 दिनांक : 16/06/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०७२७/२०२४**
**बोर्ड क्र.१८**

श्री. राजेंद्र माणिकराव जाधव, — अपिलार्थी
रा. रत्नमाला लॉन्स जाफ्राबाद रोड, भोकरदन,
ता.भोकरदन, जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, भोकरदन, जि. जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, भोकरदन, जि. जालना

**(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १८.०९.२०२४ | १. दि.११.०४.२०२२ रोजी दिलेल्या अर्जाबाबत सवीस्तर कारवाईची माहिती देण्यात यावी. २. दि.१५.०६.२०२२ रोजी दिलेल्या अर्जा संबंधात माहिती देण्यात यावी. ३. मा. जिल्हाधिकारी यांच्याकडून आलेले पत्र दि.१९.०७.२०२३ पत्रासंबंधात कार्यवाईची माहिती मिळणेबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांना माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत नाही. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, भोकरदन, जि. जालना यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, भोकरदन, जि. जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही; असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, भोकरदन, जि. जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, भोकरदन, जि.जालना यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6168 दिनांक : 16/06/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०७२८/२०२४**
**बोर्ड क्र.१९**

श्री. राजेंद्र माणिकरव जाधव, — अपिलार्थी
रा. रत्नमाला लॉन्स जाफ्राबाद रोड, भोकरदन,
ता. भोकरदन, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, — : उत्तरवादी क्र.१
उपविभागीय अधिकारी कार्यालय, भोकरदन, जि. जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, — : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय अधिकारी कार्यालय, भोकरदन, जि. जालना

**(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.११.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०८.०९.२०२४ | दि.२५.०६.२०२२ रोजी दिलेल्या अर्जाबाबत आपल्या कार्यालयाकडून केलेल्या कारवाईची माहिती देणेबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती हि अधिनियमातील कलम २(च) मधील माहितीच्या व्याख्येत बसत नाही. त्यामुळे अशी माहिती अपिलार्थी यांना देय होत नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र.इं.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 6165 दिनांक : 16/06/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २७३/२०२१**
**बोर्ड क्र.२०**

श्री.वामन एकनाथ उगले, — अपिलार्थी
रा.प्रगती चाळ, नंबर ०२, रूम नंबर ४ घर नं.८६८६,
सावंत पार्कच्या पाठीमागे, खदानजवळ,
महालक्ष्मीनगर, अंबरनाथ(पुर्व), जि.ठाणे.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
लेखा विभाग, नगर पंचायत मंठा जि.जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, : उत्तरवादी क्र.२
नगर पंचायत मंठा जि.जालना

**(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| २० | दि.२५.०९.२०२३ | १.नगर पंचायत, मंठा अंतर्गत विविध विभागास अदा करण्यात आलेल्या देयकामधुन वर्षनिहाय कपात करण्यात आलेल्या शासकीय महसुल गौण खनिज रॉयल्टी विभागवार माहिती.<br>२. देयकामधुन कपात करून शासनास भरलेल्या तहसिलदार, मंठा यांच्याकडे भरणा केलेल्या रक्कमा गौण खनिज रॉयल्टी विभागवार व वर्षनिहाय माहिती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकुण २ मुद्यांची मागणी करण्यात आलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि.१५.१२.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपुर्ण माहिती उपलब्ध करून दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.१५.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस प्रतिसाद देऊन माहिती अर्जातील मुद्दा क्र.१ ची माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, लेखा विभाग, नगर पंचायत मंठा जि.जालना यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मधील मुद्दा क्र.२ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. मुख्याधिकारी, नगर पंचायत मंठा जि.जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6170 दिनांक : 16/06/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ७८०३/२०२४
बोर्ड क्र.२१

श्री. संतोष रामनिवास तिवारी,
रा. मारवाडी गल्ली, मु. पो. मंठा,
ता. मंठा, जि. जालना-४३१५०४ — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यालयीन अधिक्षक,
नगर पंचायत मंठा, जि. जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर पंचायत मंठा, जि. जालना — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.३०.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०२.०५.२०२४ | १. श्री. यश गोपाळ तिवारी यांच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात असलेल्या दुकान नं.७ व १४ विषयी दिवाणी न्यायालय परतूर यांच्या निकालाप्रमाणे कुठलाही अडथळा न करणेबाबत अर्ज दि.१७.०८.२०२३ व दि.०३.०४.२०२४ या दोन्ही अर्जावर केलेल्या कार्यवाही अहवालाची प्रमाणित प्रती मिळाव्यात.<br>२. जा.क्र.२०२३/न पा प्र/ कार्या-३/कावी-८७५ दि.१३.०९.२०२३ ३. जा.क्र.२०२४/न पा प्र/ कार्या-३/ कावी-२३ दि.०५.०४.२०२४ या दोन्ही पत्रावर आपल्या कार्यालयाकडून केलेल्या कार्यवाही अहवालाच्या प्रमाणित प्रती मिळाव्यात. |

| | |
|---|---|
| | ४. जा.क्र.२०२३/जमा-१/कावि दि.२०.०७.२०२३ या पत्राच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाही अहवालाची प्रमाणित प्रती मिळाव्यात. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मोघम स्वरूपाची तसेच व्यक्तीश:माहितीची मागणी केलेली आहे. त्यामुळे नगर पंचायत कार्यलयाकडुन दि.३०.०५.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे मागणी केलेली माहिती मोघम स्वरूपाची असुन आपणांस नेमक्या हव्या असलेल्या माहितीबाबत कळविल्यास माहिती पुरविण्यात येईल, असे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे. सदर पत्राची प्रत अपिलार्थी यांना कार्यालयीन शिपायामार्फत तामिल करण्यात आली असता, अपिलार्थी यांनी पत्र घेण्यास नकार दिलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांनी दि.३०.०५.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद दिल्याचे दिसुन येत आहे. सुनावणी दरम्यान आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे. तथापि अपिलार्थी यांनी सदर माहिती घेण्यास नकार दिलेला आहे. यावरून असे स्पष्ट होते की, अपिलार्थीस मागणी केलेली माहिती प्राप्त करण्यात स्वारस्य दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6233 दिनांक : 18/06/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७८०४/२०२४**
**बोर्ड क्र.२२**

श्री. शेषराव शिवाजीराव बोराडे, — अपिलार्थी
रा. बोराडे गल्ली, मु. पो.
ता. मंठा, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
कार्यालय अधिक्षक,
नगर पंचायत कार्यालय, मंठा, जि. जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर पंचायत, मंठा, जि. जालना

**(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३०.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०६.०५.२०२४ | नगर पंचायत कार्यालयामधील मालमत्ता नोंदणी हस्तांतरण फेरनोंदणी इ. बाबतची प्रचलीत नियमावली प्रचलित प्रक्रिया व मालमत्ता नोंदीशी संबंधित अभिलेखाबाबत माहिती. नगर पंचायत कार्यालय, मंठा येथील मालमत्ता नोंदणी/ हस्तांतरण/ फेरनोदणी इ. नोंदीच्या अभिलेखाशी व प्रक्रियेशी संबंधित माहिती |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने

दि.२१.०६.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसुन येत नाही. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार सुनावणी घेऊन, वस्तुनिष्ठ स्वरूपाचा स्वंयस्पष्ट निर्णय पारीत करणे अपेक्षीत आहे. तथापी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर अशी कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, मंठा जि. जालना यांनी वर नमुद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहीत तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे कलम ७(६) नुसार विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करून देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह स्पष्टपणे कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, मंठा जि. जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मंठा जि. जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. जिल्हाधिकारी, जालना यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6234 दिनांक : 18/06/2025

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,

१. जिल्हाधिकारी, जालना

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक १२९४/२०२४**
**बोर्ड क्र. २३**

श्री. शिवाजी भानुदास म्हस्के, — अपिलार्थी
रा. इंदिरानगर, अंबड, ता. अंबड, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — उत्तरवादी क्र.१
नगर पंचायत कार्यालय, बदनापूर, जि. जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर पंचायत कार्यालय, बदनापूर, जि. जालना

**(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१३.०२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २६.१०.२०२३ | १.दि.०१ जानेवारी २०२१ ते ०१ सप्टेंबर २०२३ या कालावधीतील एकूण विविध प्रकारचे काढण्यात आलेले बिलाचे ६४ नंबर व्हाऊरच्या झेरॉक्स प्रती देण्यात यावे.<br>२. जानेवारी २०२० ते २०२३ सप्टेंबर पर्यंत नगर पंचायत मध्ये संपूर्ण बिलांचे झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात.<br>३. कार्यालयामधील स्टेशनरीच्या झालेल्या खर्चाची माहिती व बिलांची झेरॉक्स प्रती देण्यात यावी, बदनापूर शहरामध्ये २०२२ व २०२३ या दोन वर्षाच्या कालावधीमध्ये कोण कोणते योजनेमधून कामे करण्यात आले. |

आज रोजी अपिलार्थी यांनी कथन केले की, जन माहिती अधिकारी हे माहिती देण्यास टाळाटाळ करीता आहेत. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी

यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे विस्तृत स्वरूपाची माहिती मागितलेली असल्याने दि.१७.०९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कलम ७(९) नुसार सदर माहिती नाकारण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.२९.०१.२०२४ रोजी निर्णय पारीत केल्याचे दिसुन येत आहे. तथापि सदर आदेशाची अंमलबजावणी झाल्याचे दिसुन येत नाही. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पारीत केलेला प्रथम अपील आदेश तसेच अधिनियमातील तरतुदी विचारात घेता, अपिलार्थी यांनी सदर माहिती करीता कलम २(त्र) नुसार माहितीचे अवलोकन घेणे संयुक्तीक ठरेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक, नगर पंचायत बदनापुर जि.जालना यांनी, अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी **एक वर्ष कालावधीची माहिती**, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करून अवलोनास्तव उपलब्ध करून द्यावी. सदर अवलोकनाच्यावेळी अपिलार्थी यांनी त्यांना नेमक्या कोणत्या एक वर्ष कालावधीची माहिती हवी आहे याबाबत जन माहिती अधिकारी यांना अवगत करावे. त्यानुसार अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकीत केलेली माहिती अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(६) नुसार विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. या संदर्भात अवलोकनासाठीचा दिनांक जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना पुरेशा कालावधीपूर्वी नोंदणीकृत टपालाद्वारे कळवावा.

२. मुख्याधिकारी, नगर पंचायत बदनापुर जि.जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 6171 दिनांक :- 16/06/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८४९२/२०२४**
**बोर्ड क्र.२७**

श्री.शिवाजी भानुदास मस्के, — अपिलार्थी
रा.इंदीरा नगर, अंबड जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
कार्यालय अधिक्षक, नगर पंचायत, घनसावंगी जि.जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, — : उत्तरवादी क्र.२
नगर पंचायत, घनसावंगी जि.जालना

**(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी असे अवगत केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली संपुर्ण माहिती पुरविण्यात आलेली आहे. माहिती अर्जाद्वारे मागणी केलली संपुर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली असुन सदर माहितीने समाधान झाल्याबाबत अपिलार्थी यांनी लेखी पोच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(सही)
**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जा.क्र. 6172 दिनांक : 16/06/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५७०३/२०२४
बोर्ड क्र.२८

श्री. सुयोग अंबादासराव खर्डेकर, — अपिलार्थी
रा. जेईएस कॉलेज रोड, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, प्लॉट नंबर पी-३/१,३/०२, अतिरिक्त एम आय डी सी जालना छत्रपती संभजा नगर रोड, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
जिल्हा प्रदुषण अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, प्लॉट नंबर पी-३/१,३/०२, अतिरिक्त एम आय डी सी जालना छत्रपती संभजा नगर रोड, जालना

**(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२७.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.११.२०२३ | मार्च २०२० ते ऑक्टोबर २०२३ पर्यंत या कालावधीतील आयकॉन स्टील व रुपम स्टील या कंपन्यांचा गेल्या तीन वर्षा ील प्रदुषण तपासणीचा अहवालाचा तपशील देण्यात यावा, तपासणी अंतर्गत किती तृटी निष्पन्न झाल्या असेल त्याची माहिती |

प्रस्तुत प्रकरणात आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे

अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागितलेली माहिती हि अधिनियमातील कलम २(च) मधील माहितीच्या व्याख्येत बसत नाही. त्यामुळे अशी माहिती अपिलार्थी यांना देय होत नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6173 दिनांक : 16/06/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १९९२/२०२४**
**बोर्ड क्र.२९**

श्री. संजय त्रिंबक उनगे, — अपिलार्थी
रा. मुकुंद निवास माळी गल्ली, बदनापूर, ता. बदनापूर,
जि. जालना-४३१ २०२.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक, — : उत्तरवादी क्र.२
राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, जालना

**(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१५.०३.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.१२.२०२३ | दि.२५.०५.२०२३ रोजीच्या आर्जाची माहिती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहिती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे. प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांना त्यांच्या

माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क यांचे कार्यालय, जालना यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क यांचे कार्यालय, जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांचे कार्यालय, जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. विभागीय उपायुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांचे कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. विभागीय उपायुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांचे कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6174 दिनांक : 16/06/2025

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
विभागीय उपायुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांचे कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७५८५ /२०२४**
**बोर्ड क्र.३०**

श्री. मिलिंद दिनकर वाहुळे, — अपिलार्थी
रा. श्रीपत धामणगांव, ता. घनसावंगी, जि. जालना-४३१ २११.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
कार्यालय अधिक्षक,
राज्य उत्पादन शुल्क विभाग, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
अधिक्षक,
राज्य उत्पादन शुल्क विभाग, जालना

**(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१६.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १५.०१.२०२४ | सन २०१९ ते २०२३ या कालावधीतील श्री पराग मोरेश्वर नवलकर अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क जालना यांनी वापरलेल्या वाहनाचे लॉकबुक देणे. |

प्रस्तुत प्रकरणात आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणताही पत्र व्यवहार न केल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.०७.०२.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे मागितलेली माहिती ही कलम ८(१)(त्र) नुसार नाकारलेली आहे. प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित असुन अशी

माहिती प्रकट केल्याने त्रयस्थाच्या खाजगी बाबीमध्ये आंगतुक हस्तक्षेप होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशी माहिती अधिनियमातील कलम ८(१)(त्र)नुसार अपिलार्थीस देय होत नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6175 दिनांक :- 16/06/2025

(सु. वोर्ड अ.क्र.३० द्वितीय अपील क्रमांक ७५८५/२०२४ २/२)

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७९३/२०२४, ४४९४/२०२४**
**बोर्ड क्र.३१, ३२**

श्री.संजय त्रिबंक उनगे, — अपिलार्थी
रा.मुकुंद निवास, माळी गल्ली, बदनापुर जि.जालना.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, औद्योगिक विकास महामंडळ, अति. जालना औद्योगिक वसाहत, जालना. : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ३१ | ०१.११.२०२३ | दि.१८.०९.२०२३ रोजीच्या अर्जाची माहिती मिळणेबाबत. |
| ३२ | १५.०१.२०२४ | माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये महाराष्ट्र औद्यागिक विकास महामंडळ उप अभियंता कार्यालयातील जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या प्रशिक्षणाबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती न देता दिशाभुल करणारी माहिती उपलब्ध करून दिलेली आहे. सदर माहिती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांनी बोर्ड क्र.३१ मध्ये दि.३०.११.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे तसेच बोर्ड क्र.३२ मध्ये दि.०९.०२.२०२४ रोजीच्या

पत्राद्वारे अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.०९.०१.२०२४ व २८.०३.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करून प्रथम अपील निकाली काढलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती व त्यास अनुसरून जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारीत केलेले प्रथम अपील आदेश व अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारीत केलेल्या प्रथम अपील आदेशात बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6176 दिनांक : 16/06/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ११९३/२०२४
बोर्ड क्र.३३

श्री.वामन एकनाथ उगले,
प्रगती चाळ नं.२, रूम नं.४, घर नं.८६८६,
सावंत पार्कच्या पाठीमागे, खदानजवळ,
महालक्ष्मीनगर, अंबरनाथ(पुर्व), जि.ठाणे. — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक,
जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, जालना — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २२.०९.२०२३ | दि.०१.०८.२०२३ पासुन आजपर्यंतच्या कार्यालयाच्या आवक-जावक नोंदवहीच्या प्रमाणित प्रती व इतरबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहिती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे. प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांना त्यांच्या

माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, जालना यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. प्रादेशिक उपसंचालक, भुमी अभिलेख कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. प्रादेशिक उपसंचालक, भुमी अभिलेख कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 6177 दिनांक : 16/06/2025

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
प्रादेशिक उपसंचालक, भुमी अभिलेख कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १११४/२०२४**
**बोर्ड क्र.३४**

श्री.वामन एकनाथ उगले, — अपिलार्थी
प्रगती चाळ नं.२, रूम नं.४, घर नं.८६८६,
सावंत पार्कच्या पाठीमागे, खदानजवळ,
महालक्ष्मीनगर, अंबरनाथ(पुर्व), जि.ठाणे.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, जालना

**(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २२.०९.२०२३ | सेवली सज्जा मधील दहीधडा प्रमाणे संपुर्ण अभिलेखाची यादी तसेच मिळकत पत्रीका-३१२ यांची संपुर्ण हक्क नोंदणी चौकशी अहवाल व इतरबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहिती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी असे अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करून दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरून होत नाही. तथापि अपिलार्थी यांना माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती आयोगाच्या निर्देशानुसार वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने अपिलार्थी यांना उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांनी प्रतिसाद दिल्याचे दिसुन येत नाही. त्यानुषंगाने जन माहिती अधिकारी यांच्याकडुन अनुक्रमे कलम ७(१) चा भंग झाल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे दिसुन येत नाही. त्यानुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडुन अनुक्रमे कलम १९(६) चा भंग झाल्याचे दिसुन येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमुद केलेले आहे. तसेच आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने माहिती अपिलार्थीस उपलब्ध करून देण्याचे आज रोजी सुनावणी दरम्यान अवगत केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, जालना यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, जालना यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 6178 दिनांक : 16/06/2025

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
प्रादेशिक उपसंचालक, भुमी अभिलेख कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ११३८/२०२४**
**बोर्ड क्र.३५**

श्री.अभिषेक बालाप्रसाद व्यास, — अपिलार्थी
रा.बीड सडक राम मंदीराजवळ, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
मुख्यालय सहाय्यक, उप अधिक्षक भुमि अभिलेख,
जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप अधिक्षक भुमि अभिलेख, जालना

**(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३०.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०२.०९.२०२३ | जालना शहर मालमत्ता क्र.३२३० न.भु.क्र.१-३३-१८८ चे आखिव पत्रीकेवर गोपाल रामचंद्र झाबेवाल नावाची नोंद करताचे मा.जमाबंदी आयुक्त आणि संचालक भुमि अभिलेख पुणे यांचेकडील क्र./ना.भु./मि प/अक्षरी नोंद/२०१५ पुणे दि.१६.०२.२०१५ चे परिपत्रक व फेरफार क्र.२१५५० ची प्रत मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०६.११.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे माहिती अर्जातील नमुद संचिकेचा अभिलेखामध्ये शोध घेतला असता, सदरची संचिका अभिलेखात आढळुन येत नसल्याने संचिका पुरविता येत नाही, असे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे. तसेच अपिलार्थी यांचे प्रथम अपील कार्यालयास प्राप्त झालेले नाही.

प्रस्तुत प्रकरणात आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने

जन माहिती अधिकारी यांनी दि.०६.११.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. याबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागणे संयुक्तीक ठरेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. .

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

प्र १११इं

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 6236 दिनांक : 18/06/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ४१७३/२०२४**
**बोर्ड क्र.३६**

श्री. देवचंद पुनमचंद सावरे — अपिलार्थी
रा. मस्तगड जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप अधिक्षक भुमि अभिलेख, जालना — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०३.०१.२०२४ | भूमापन क्र.६९६५ या जमीनीचे पि आर कार्ड टोच नकाशा व संपुर्ण फेर फार सहीत मुळ संचिका देण्यात यावी. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांना माहिती अर्जाद्वारे आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करून दिली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, उप अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, जालना यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, उप अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. उप अधिक्षक भूमि अभिलेख, जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. जिल्हा अधिक्षक, भुमि अभिलेख, जालना यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6237 दिनांक : 18/06/2025

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
जिल्हा अधिक्षक, भुमि अभिलेख, जालना

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८४९१/२०२४**
**बोर्ड क्र.३७**

श्री. अभिमन्यु मनोहरराव लोखंडे, — अपिलार्थी
रा.मोरंडी मोहल्ला जुना जालना, ता.जि.जालना.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, : उत्तरवादी क्र.१
उप अधिक्षक भुमि अभिलेख, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उप अधिक्षक,
उप अधिक्षक भुमि अभिलेख, जालना

**(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०२.०७.२०२४ | न.भु.क्र.१०३३७, १०३३८, १०३३९-४० या महाराष्ट्र शासनाच्या भुखंडावर अतिक्रमण केलेले त्वरीत हटविणेबाबत दि.१२.०६.२०२४ रोजी तक्रार दिली होती त्यावर काय कार्यवाही केली त्याची कागदपत्रेबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसुन येत नाही. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार सुनावणी घेऊन, वस्तुनिष्ठ स्वरूपाचा स्वंयस्पष्ट निर्णय पारीत करणे अपेक्षीत आहे. तथापी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर अशी कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, उप अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, जालना यांनी वर नमुद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहीत तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे कलम ७(६) नुसार विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करून देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह स्पष्टपणे कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, उप अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. उप अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. जिल्हा अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, जालना यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.-----6235----- दिनांक :- 18/06/2025

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
जिल्हा अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, जालना

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८६७७/२०२४**
**बोर्ड क्र.३८**

श्री.लक्ष्मण सोनाजी जाधव, — अपिलार्थी
रा.राजर्षी शाहु नगर, ज्ञान ज्योत शाळेच्या बाजुला,
अंबड रोड, जालना.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, — : उत्तरवादी क्र.१
उप अधिक्षक भुमि अभिलेख, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप अधिक्षक,
उप अधिक्षक भुमि अभिलेख, जालना

**(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३०.०७.२०२४ | अभिलेख ७/१२ ग.नं.१३४.१३५ मधील रंगनाथ कारभारी जाधव(पू) काशीना कारभारी जाधव व कृष्णा कारभारी जाधव यांचे नावे ओघळण्यात आलेल्या आदेशाची प्रत मिळणे व इतरबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी असे अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करून दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरून होत नाही. तथापि अपिलार्थी यांना माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती आयोगाच्या निर्देशानुसार वर्तमान जन माहिती अधिकारी

या नात्याने अपिलार्थी यांना उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरून, अपिलार्थी यांच्या माहिती अ अधिकारी यांनी प्रतिसाद दिल्याचे दिसुन येत नाही. त्यानुषंगाने जन माहिती अधिकारी कलम ७(१) चा भंग झाल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अ अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे दिसुन येत नाही. त्यानुषंगाने प्रथ यांच्याकडुन अनुक्रमे कलम १९(६) चा भंग झाल्याचे दिसुन येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणी अपिलार्थी गैरहजर आहेत. अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमुद केलेले आहे. तसेच उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने माहिती अपिलार्थीस उपलब्ध करून देण्याचे आज रोजी सुनावणी दरम्यान अवगत केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, जालना यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, जालना यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र शाह

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6179 दिनांक : 16/06/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६४१/२०२४**
**बोर्ड क्र.३९**

श्री.शिवनारायण फकिरबा खंबाट, — अपिलार्थी
रा.पिंपळखुटा ता.जाफ्राबाद जि.जालना.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
सहायक निबंधक सहकारी संस्था, जाफ्राबाद, जि.जालना.

२ प्रथम अपिलीय अधिकारी, — : उत्तरवादी क्र.२
सहायक निबंधक सहकारी संस्था, जाफ्राबाद, जि.जालना

**(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २३.१०.२०२३ | सहायक निबंधक कार्यालय, जाफ्राबाद सन २०१९ ते सन २०२३ पर्यंत सावकारी गुन्हे दाखल झाले व आतापर्यंत किती बनावट परवानाधारक सावकारावर कारवाई करुन किती किती शेतक-यास न्याय मिळवुन दिला त्या सर्व शेतक-यांची यादी व इतरबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी असे अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध माहिती अपिलार्थी यांना दि.०६.११.२०२३ रोजीच्या पत्रान्वये नोंदणीकृत टपालाद्वारे, तसेच दि.२९.१२.२०२३ रोजी प्रथम अपील सुनावणी दरम्यान पुनश्च व्यक्तीश: उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी अपुर्ण उपलब्ध करून दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी दि.०६.११.२०२३ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.२९.१२.२०२३ रोजी जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करून प्रथम अपील फेटाळलेले आहे. उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारीत केलेल्या प्रथम अपील आदेशात बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

उपरोक्तनुसार अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6180 दिनांक : 16/06/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०९०१/२०२४**
**बोर्ड क्र.४०**

श्री.शिवनारायण फकिरबा खंबाट, अपिलार्थी
रा.पिंपळखुटा ता.जाफ्राबाद जि.जालना.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
उप जिल्हा निबंधक सहकारी संस्था, जालना.

२ प्रथम अपिलीय अधिकारी, : उत्तरवादी क्र.२
जिल्हा निबंधक सहकारी संस्था, जालना.

**(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २३.१०.२०२३ | सहायक निबंधक कार्यालय जाफ्राबाद सन २०१९ ते सन २०२३ पर्यंत सावकारी गुन्हे दाखल झाले व आतापर्यंत किती बनावट परवानाधारक सावकारावर कारवाई करुन किती शेतक-यास न्याय मिळवुन दिला त्या सर्व शेतक-यांची यादी व इतरबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसुन येत नाही. त्यानुषंगाने जन माहिती अधिकारी यांच्याकडुन अनुक्रमे कलम ७(१) चा भंग झाल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे दिसुन येत नाही. त्यानुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडुन अनुक्रमे कलम १९(६) चा भंग झाल्याचे दिसुन येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती

न दिल्यामुळे, असे कारण नमुद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, उप जिल्हा निबंधक सहकारी संस्था, जालना यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, उप जिल्हा निबंधक सहकारी संस्था, जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. जिल्हा निबंधक सहकारी संस्था, जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. जिल्हा निबंधक सहकारी संस्था, जालना यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र.२।।६

(प्रकाश इंदलकर)

राज्य माहिती आयुक्त,

खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6181 दिनांक : 16/06/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ११३९/२०२४**
**बोर्ड क्र. ४८**

श्री. अभिषेक बालाप्रसाद व्यास,
रा.बीड सडक राम मंदीरजवळ, जालना — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक,
जालना शहर महानगरपालीका, जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
आयुक्त, महानगरपालीका, जालना — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ४८ | दि.१५.०९.२०२३ | जालना नगर परिषद येथे १९९६ ते २००० मधील कालावधीत जन्म मृत्यु विभागात कार्यरत एकुण अधिकारी, कर्मचारी यांची विभाग निहाय नियुक्ती आदेशासह माहिती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२२.०९.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती न देता अपुर्ण माहिती उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.२२.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस

प्रतिसाद दिल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.१७.११.२०२३ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ३० दिवसात अपिलार्थीस उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि सदर आदेशाची अंमलबजावणी झाल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, आस्थापना विभाग, जालना शहर महानगरपालीका, जालना यांनी, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद माहितीचा कार्यालयीन अभिलेखात कसोशिने शोध घ्यावा व उपलब्ध माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना स्पष्टपणे कळविण्यात यावे.

२. मुख्याधिकारी, जालना शहर महानगरपालीका, जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमल बजावणी सुनिश्चित करावी. तसेच अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अभिलेखात उपलब्ध होत नसल्यास संबधिताविरूद्ध सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ नुसार कार्यवाही अनुसरावी.

३. उपरोक्तनुसार द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.-6182--------दिनांक :-16/06/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ९००४/२०२४**
**बोर्ड क्र. ५३**

श्री.संतोष दिनकर अग्निहोत्री, — अपिलार्थी
रा.कसबा विठ्ठल मंदीराजवळ, जुना जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, : उत्तरवादी क्र.१
जालना शहर महानगरपालीका, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा आयुक्त : उत्तरवादी क्र.२
जालना शहर महानगरपालीका, जालना

**(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ५३ | दि.१४.०६.२०२४ | माहे १० ऑगस्ट, २०२२ पासुन निलंबन निर्वाह भत्त्याबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती न देता अपुर्ण माहिती उपलब्ध करून दिलेली आहे. प्रथम अपीलय अधिकारी यांनी दि.१२.०९.२०२४ रोजी पारीत केलेल्या प्रथम अपील आदेशानुसारही जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती दि.०८.०७.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.०८.७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस प्रतिसाद दिल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी

दि.१२.०९.२०२४ रोजी सुनावणी घेऊन प्रथम अपील अंशत: मान्य करून अपिलार्थी यांना निलंबन काळातील चरितार्थ भत्ता व्यतीरिक्त बाबी विषयी असलेल्या तरतुदीची माहिती १० दिवसात उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि सदर आदेशाची अंमलबजावणी झाल्याचे उपलब्ध कागदपत्रावरून दिसुन येत नाही. उपरोक्त सर्व बाबींचा सारासार विचार करता, प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पारीत केलेल्या प्रथम अपील आदेशात बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, आस्थापना विभाग, जालना शहर महानगरपालीका, जालना यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पारीत केलेल्या दि.१२.०९.२०२४ रोजीच्या प्रथम अपील आदेशानुसार माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपिलार्थी यांना कलम ७(६) नुसार विनामुल्य उपलब्ध करून द्यावी.

२. आयुक्त, जालना शहर महानगरपालीका, जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 6183 दिनांक : 16/06/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०२७७/२०२४**
**बोर्ड क्र. ६३**

श्री.वैजिनाथ गुलागराव दिघे, — अपिलार्थी
मु.चितोडा, पो.पिर पिंपळगांव ता.बदनापुर जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
बद्रीनारायण बारवाले कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
प्राचार्य, बद्रीनारायण बारवाले कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, जालना

**(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ६३ | दि.०६.११.२०२३ | सन २००९ ते २०२३ पर्यंत विशेष कक्ष विभागकडुन सदर कालावधीत संस्था / महाविद्यालयाने शिक्षक व शिक्षकेत्तर संवर्गांची बिंदुनामावली नोंदवही व इतरबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांना माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी विशेष कक्ष, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे केलेला आहे. कक्ष अधिकारी विशेष कक्ष, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांनी सदर अर्ज दि.०७.११.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी, बद्रीनारायण बारवाले कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जालना यांच्या कडे वर्ग केलेला आहे. त्यानुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दि.२१.११.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे, मागणी केलेली माहिती शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, दि.१७.१०.२०१४ नुसार नाकारलेली आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे

अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही विस्तृत तसेच मोठ्या कालावधीची असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, बद्रीनारायण बारवाले कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जालना यांनी, आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी **एक वर्ष कालावधीची माहिती**, अवलोकनास्तव उपलब्ध करून द्यावी व अवलोकनाअंती अपिलार्थी यांनी चिन्हांकीत केलेली ५० पृष्ठांची महिती अपिलार्थी यांना कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. त्यापेक्षा अधिक माहितीची आवश्यकता असल्यास नियमाप्रमाणे सशुल्क उपलब्ध करून द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. प्राचार्य, बद्रीनारायण बारवाले कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्तनुसार द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6238 दिनांक : 18/06/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ००६/२०२४
बोर्ड क्र. ६८

श्री.बाजीराव भिकाजी हिवाळे, — अपिलार्थी
रा.शिवाजीनगर, म्हाडा नवीन मोंढा रोड, जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महावितरण शहर उपविभाग, मस्तगड पावर हाऊस, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता, महावितरण शहर उपविभाग, मस्तगड पावर हाऊस, जालना

**(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ६८ | दि.१६.१०.२०२३ | ग्राहक क्र.५१००३०६६६९७४ श्री.बाजीराव भिकाजी हिवाळे यांचा विज पुरवठा माहे जुन २०२३ पासून कापलेला आहे. सदरील ग्राहकाचा विज पुरवठा कापण्याचे कारण स्पष्ट करणारे दस्तऐवज व इतर बाबत |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती न देता अपुर्ण माहिती उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करून दिली किंवा कसे याचा बोध होत नाही. तथापि आता आयोगाच्या निर्देशानुसार वर्तमान जनामहिती अधिकारी या नात्याने अपिलार्थी यांना त्यांच्या

माहिती अर्जान्वये कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती अर्जाद्वारे आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करून देणेबाबत आयोगास अश्वासित केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महावितरण शहर उपविभाग, मस्तगड पावर हाऊस, जालना यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. कार्यकारी अभियंता, महावितरण शहर उपविभाग, मस्तगड पावर हाऊस, जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्तनुसार द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

प्रिशाइं.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 6239 -दिनांक :- 18/06/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७७४७/२०२४**
**बोर्ड क्र. ७३**

श्रीमती सोनी गणेश अडीयाल, — अपिलार्थी
रा.सोनल नगर, निलम टॉकीजच्या मागे, जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता, — उत्तरवादी क्र.१
जालना शहर महानगरपालीका, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.२
आयुक्त, महानगरपालीका, जालना

**(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली संपुर्ण माहिती मला जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करून दिलेली आहे. सदर माहितीने समाधान झालेले असल्यामुळे विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्यात यावे. ही बाब विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्तनुसार द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6184 दिनांक : 16/06/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ९६८७/२०२४**
**बोर्ड क्र. ७४**

डॉ.सुरेखा शिवाजी भालशंकर, — अपिलार्थी
प्लॉट नं.६७, समर्थनगर, अंबड रोड,
Z.P.ऑफीसच्या पाठीमागे, जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
मंडळ कार्यालय, महावितरण कंपनी, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी, — : उत्तरवादी क्र.२
मंडळ कार्यालय, महावितरण कंपनी, जालना

**(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ७४ | दि.१५.०७.२०२४ | सन २०१५ ते २०२४पर्यंत महावितरण, जालना येथील कार्यालयांनी महावितरण मुंबई दुकाने व आस्थापना कायद्याअंतर्गत काढलेले नोंदणी व परवाना व त्यासंदर्भतील सर्व दस्ताऐवजबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जाद्वारे आवश्यक असलेली माहिती दि.२७.०८.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे एकुण ६ पृष्ठांची माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.२७.०८.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. आज रोजी सुनावणी करीता अपिलार्थी गैरहजर आहेत. मात्र त्यांनी आयोगाकडील दाखल द्वितीय अपील

प्रयोजनामध्ये अर्धवट माहिती दिली, न्यायालयीन कामकाजासाठी माहितीची आवश्यकता, असे कारण नमुद केलेले आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही विस्तृत व मोठ्या कालावधीची असल्याचे दिसुन येत आहे. हि बाब विचारात घेता, अपिलार्थी यांनी कलम २(त्र) नुसार माहितीचे अवलोकन घेणे संयुक्तीक ठरेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, मंडळ कार्यालय महावितरण कंपनी, जालना यांनी, आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी अवलोकनास्तव उपलब्ध करून द्यावी व अवलोकनाअंती अपिलार्थी यांनी चिन्हांकीत केलेली ५० पृष्ठांची महिती अपिलार्थी यांना कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. त्यापेक्षा अधिक माहितीची आवश्यकता असल्यास नियमाप्रमाणे सशुल्क उपलब्ध करून द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. कार्यकारी अभियंता, मंडळ कार्यालय महावितरण कंपनी, जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्तनुसार द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

प्र. शा.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र.- 6240 दिनांक :- 18/06/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १०२१८/२०२४
बोर्ड क्र. ७५

श्री.सय्यद रफिक सय्यद लाल, — अपिलार्थी
रा.हिमायतनगर, प्लॉट नंबर १४,
आरेफ कॉलनी, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
कार्यकारी अभियंता(प्रशासन),
महावितरण, देऊळगांव राजा रोड, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
अधिक्षक कार्यकारी अभियंता,
महावितरण, देऊळगांव राजा रोड, जालना

(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ७५ | दि.१६.०६.२०२४ | शेख खिझारोद्दीन & मोईन शेख यांच्याबाबत एकुण ३ मुद्यांची माहितीबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारीत केलेल्या प्रथम अपील आदेशानुसार दि.२६.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यामुळे विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.२६.०९.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करून

दिल्याचे दिसुन येत आहे. जन महिती अधिकारी यांनी उपलब्ध करून दिलेल्या माहिती संदर्भात अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र अर्ज करून दाद मागावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 6253 दिनांक : 19/06/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २३३७/२०२४**
**बोर्ड क्र.७८**

श्री.एकनाथ रामधन राठोड, — अपिलार्थी
बेगमपुरा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
प्रशासकीय अधिकारी, सामान्य रूग्णालय, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
जिल्हा शल्य चिकीत्सक, सामान्य रूग्णालय, जालना

**(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३०.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २९.११.२०२३ | मा.राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचे द्वितीय अपील क्र.३२७९ सुनावणी दिनांक २९.०८.२०२३ नुसार केलेल्या कार्यवाहीचा दैनंदिन प्रगती अहवाल. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसुन येत नाही. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार सुनावणी घेऊन, वस्तुनिष्ठ स्वरूपाचा स्वंयस्पष्ट निर्णय पारीत करणे अपेक्षीत आहे. तथापी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर अशी कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, सामान्य रूग्णालय, जालना यांनी वर नमुद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहीत तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे कलम ७(६) नुसार विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करून देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह स्पष्टपणे कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, सामान्य रूग्णालय, जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. जिल्हा शल्य चिकीत्सक, सामान्य रूग्णालय,जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. उप संचालक, आरोग्य सेवा, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6241 दिनांक : 18/06/2024

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
उप संचालक, आरोग्य सेवा, छत्रपती संभाजीनगर

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ६८४९/२०२४
बोर्ड क्र.७९

श्री.समीउद्दीन कमरोद्दीन काझी, — अपिलार्थी
रा.महाविर नगर चिखली, ता.चिखली जि.बुलढाणा

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
जिल्हा स्त्री व बाल रूग्णालय, जालना.

२ प्रथम अपिलीय अधिकारी, : उत्तरवादी क्र.२
जिल्हा स्त्री व बाल रूग्णालय, जालना.

(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १५.०२.२०२४ | सुलताना सलिम बागवान पती सलीम रऊफ बागवान रा.नांदापुर ता.जि.जालना या स्त्रीला दि.०१.११.२०१४ ते ०१.१२.२०१४ या कालावधीत देण्यात आलेली RCH-ID ची प्रत, Health Card Entry इत्यादीबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित असुन अशी माहिती प्रकट केल्याने त्रयस्थाच्या खाजगी बाबीमध्ये अनाहुत हस्तक्षेप होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशी माहिती अधिनियमातील कलम ८(१)(त्र)नुसार अपिलार्थीस देय होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---6254--- दिनांक :-13/06/2025---

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८४९०/२०२४**
**बोर्ड क्र.८०**

श्री.प्रशांत आसाराम बोनगे, — अपिलार्थी
रा.अंबा ता.परतुर जि.जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
जिल्हा हिवताप अधिकारी, जिल्हा हिवताप कार्यालय, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप संचालक, आरोग्य सेवा, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०२.०६.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०३.०१.२०२४ | श्री.विजय शिरसाठ यांची प्रथम नियुक्ती उपसंचालक आरोग्य सेवा, छत्रपती संभाजीनगर यांच्या द्वारे कनिष्ठ लिपिक या पदावर स्वातंत्र्य सैनिक नामनिर्देशन या संवर्गातुन करण्यात आलेली आहे. संबंधितांच्या नियुक्तीची संपुर्ण संचिका. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०७.०६.२०२४ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागितलेली माहिती १५ दिवसांत अपिलार्थीस उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि सदर प्रथम अपील आदेशाची अमंलबजावणी झाल्याचे दिसुन येत नाही. प्रस्तुत प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारीत केलेला प्रथम अपील आदेश विचारात घेता, सदर आदेशात बदल करण्याची आयोगास

आवश्यकता वाटत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा जिल्हा हिवताप अधिकारी, जिल्हा हिवताप कार्यालय, जालना यांनी वर नमुद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहीत तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे कलम ७(६) नुसार विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करून देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह स्पष्टपणे कळविण्यात यावे.

२. उप संचालक, आरोग्य सेवा, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---6242--- दिनांक :---18/06/2024